*MVP, Samaj's*

# *S.V.K.T. Arts, Science & Commerce College, Deolali Camp, Nashik*

# *Department of Political Science All Initiatives*

# “HUMAN RIGHTS DAY”




**Dr. Prashant Deshpande Addressing on the Occasion of “Human Rights Day”-10/12/2019**




**Dr. Vitthalrao Kapadi Addressing on the Occasion of “Human Rights Day”-10/12/2019**

***THE NEWS CUTTING FROM 'DIVYA MARATHI' NEWSPAPER REGARDING 'HUMAN RIGHTS DAY'- 11/10/2020***

# देवळाली महाविद्यालयात मानवी हक्क दिन


**प्रतिनिधी** | देवळाली कॅम्प




येथील मराठा विद्या प्रसारक समाजाच्या एस.व्ही.के.टी. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात जागतिक मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. एच. पी. टी. महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रशांत देशपांडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय मेधणे होते. माणसाचे हक्क अन् कर्तव्य याची जाणीव या कार्यक्रमाच्या माध्यमातून करून देण्यात आली.

व्यासपीठावर उपप्राचार्य एस. एल. भोज, प्रा. सुधाकर पवार, प्रा. दिलीप जाधव, प्रा. मिलिंद ठाकरे, प्रा. आर. आर. सोनवणे, डॉ. एम. के. आहेर उपस्थित होते. डॉ. प्रशांत देशपांडे यांनी आपल्या व्याख्यानामध्ये राज्यसंस्था कशा निर्माण झाल्यात, सामाजिक करार, स्वातंत्र्य, समता, न्याय. या संकल्पनांचे महत्त्व विशद केले. मानवी जीवन जगत असताना त्याचे अधिकार, हक्क किती महत्त्वाचे आहे याविषयी विस्तृत विवेचन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांनी आपल्या मनोगतामध्ये मानवी अधिकारांची सुरुवात कधी झाली. जागतिक स्तरावरील मानवी हक्कांविषयी अनेक प्रश्नांची सखोल माहिती त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडली. प्रास्ताविकात महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. व्ही. डी. कापडी यांनी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. आजही अनेक प्रगतिशील देशांमध्ये मोठ्या प्रमाणात वंशवाद, वर्णवाद, धार्मिक भेदभाव, जातीयवाद यावरून माणसा-माणसांमध्ये भेद केला जातो. त्यांचे अधिकार नाकारले जातात. अशावेळी मनुष्याने केवळ माणसाकडे मानवी दृष्टिकोनातून बघावे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. प्रा. एस. एस. कावळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता आहेर यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक-प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

***THE NEWS CUTTING FROM 'GAVAKARI' MARATHI NEWSPAPER REGARDING 'HUMAN RIGHTS DAY'- 11/10/2020***



# मानवी हक्क दिन एसव्हीकेटीत साजरा

**म. टा. वृत्तसेवा,** देवळाली कॅम्प

येथील मविप्र संचालित श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालय येथे जागतिक मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. या वेळी एचपीटी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत देशपांडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांनी भूषवले. मंचावर उपप्राचार्य प्रा. एस. एल. भोज, प्रा. सुधाकर पवार, प्रा. दिलीप जाधव, प्रा. मिलिंद ठाकरे, प्रा. आर. आर. सोनवणे, डॉ. एम. के. आहेर उपस्थित होते.

डॉ. प्रशांत देशपांडे यांनी आपल्या व्याख्यानामध्ये राज्य संस्था कशा निर्माण झाल्यात, सामाजिक कारार, स्वातंत्र्य, समता, न्याय या संकल्पनांचे महत्त्व विशद केले. मानवी जीवन जगताना त्याचे अधिकार, हक्क किती महत्त्वाचे आहे याविषयी विस्तृत विवेचन केले. प्राचार्य डॉ. मेधणे यांनी आपल्या मनोगतात मानवी अधिकारांची सुरुवात कधी झाली. जागतिक स्तरावरील मानवी हक्कांविषयीचे अनेक प्रश्नांची सखोल माहिती त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडली. प्रास्ताविकातून डॉ. व्ही. डी. कापडी यांनी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनाचे महत्त्व स्पष्ट केले.

आजही अनेक प्रगतिशील देशांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात वंशवाद ,वर्णवाद, धार्मिक भेदभाव, जातीयवाद यावरून माणसा-माणसांमध्ये भेद केला जातो. त्यांचे अधिकार नाकारले जातात अशावेळी मनुष्याने केवळ माणसाकडे मानवी दृष्टिकोनातून बघावे, असा संदेश त्यांनी या वेळी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. सविता आहेर यांनी केले तर आभार प्रा. एस. एस. कावळे यांनी मानले.

**CONSTITUTION DAY**




**Prin. Dr. Vijay Medhane paying tribute to Dr. Babasaheb Ambedkar - 26/11/2019**




**Prin. Dr. Vijay Medhane Addressing on the Occasion of " Constitution Day "-26/11/2019**




**Rally on 'Constitution Day'-26/11/2019**



**NSS Volunteers and NCC Cadets and students taking Pledge-26/11/2019**

***THE NEWS CUTTING FROM 'DIVYA MARATHI' NEWSPAPER REGARDING 'CONSTITUTION DAY'- 27/11/2019***



दिव्य मराठी विशेष • विद्यार्थ्यांना दिली संविधानाची सखोल माहिती; काही ठिकाणी मान्यवरांचे व्याख्यान; चित्रकला स्पर्धा

# देवळाली कॅम्पमधील विविध शाळांत संविधान दिन साजरा

प्रतिनिधी । देवळाली कॅम्प

येथील एसव्हीकेटी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयजी मेधणे यांनी भूषविले. या वेळी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. डी. एस. शिंदे, डॉ. व्ही. डी. कापडी, प्रा. एस. एल. भोज, एस. के. जाधव, प्रा. ए. एम. पटेल, प्रा. डी एम. ढोली उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांनी आपल्या मनोगतामध्ये भारतीयांसाठीचे 'संविधानाचे' महत्त्व अधोरेखित केले. 'संविधान' हे खऱ्या अर्थाने जात, धर्म, विषमता या संकुचित धारणेपलीकडे व भारतीयांना मानवतावादाकडे घेऊन जाणारे तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानाच्या आधारे आजपर्यंत भारतीय लोकशाही देशाचे सार्वभौमत्व राष्ट्रीय एकता, एकात्मता व संपूर्ण अखंडत्व टिकून राहू शकले. याकरिता देशातील सर्वच नागरिकांनी या संविधानाचा आदर करणे आवश्यक असल्याचे व्यक्त केले. यावेळी प्रचार्यांनी घटनेच्या सरनाम्याचे विद्यार्थ्यांकडून शपथ रूपात वाचन करून घेतले.

कापडी यांनी आपल्या मनोगत मांडताना संविधानाचे लोकशाहीतील महत्त्व विशद केले. संविधान निर्मितीचा इतिहास आणि त्यासाठी राज्यघटनाकारांनी कशाप्रकारे प्रयत्न केले याचे वर्णन त्यांनी आपल्या मनोगतात मांडले. यानंतर जनजागृती हितार्थ शोभायात्रा काढण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. एस. एस. कावळे यांनी केले. एन. एस. एस. अधिकारी प्राध्यापक मिलिंद ठाकरे यांनी आभार मानले. तर सूत्रसंचालन सविता आहेर यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक-प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

### रुसी इराणी सेंटरमध्ये विशेष मुलांनी चित्र रेखाटले

रुसी इराणी सेंटर येथील विशेष मुलांची शाळा असलेल्या रुसी इराणी सेंटर येथे मुलांनी घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चित्रात रंग भरत अनोखे अभिवादन केले. प्रारंभी प्रांगणात शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून संविधान प्रास्ताविकेचे वाचन करून घेतले. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनं खाऊ वाटप करण्यात आला.

### कॅन्टोन्मेंट बोर्ड हायस्कूल

शाळेत आयोजित कार्यक्रमात मुख्याध्यापिका नलिनी लोखंडे यांनी संविधानाचे महत्त्व सांगितले व वसंत शिंदे यांनी नागरिकांसाठी संविधान मार्गदर्शक असल्याचे सांगितले. काकवीपुरे यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी शिक्षक विष्णू वाघ, आर. आर. यशवंते यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

***THE NEWS CUTTING FROM ‘GAVAKARI’ MARATHI NEWSPAPER REGARDING ‘CONSTITUTION DAY’- 27/11/2019***



## विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालय

भारतीय संविधान हे खऱ्या अर्थाने जात, धर्म, विषमता, यापलीकडे भारतीयांना मानवतावादाकडे घेऊन जाणारे तत्वज्ञान आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजय मेधने यांनी केले. येथील मविप्र संचालित श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त ते बोलत होते. सर्व उपस्थित व सर्व विद्यार्थ्यांकडून घटनेच्या सरनाम्याचे शपथ रूपात वाचन करून घेण्यात आले. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. डी. कापडी यांनी संविधानाचे लोकशाहीतील महत्त्व विशद केले. त्यानंतर परिसरातून विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढली. यावेळी उपप्राचार्य प्रा. डी. एस. शिंदे, प्रा. एस. एल. भोज उपस्थित होते.

# VOTER AWARENESS DRIVE




**Prin. Dr. Vijay Medhane Addressing on the Occasion of “Voter Awareness Day”-25/01/2020**




**Prin . Dr. Vijay Medhane with all the staff and students marching for ‘Voter Awarness Rally’”-25/01/2020**




**Rally on 'Voter Awarness Day'"-25/01/2020**




**Rally on 'Voter Awareness Day' "-25/01/2020**

# VOTER'S SURVEY




**Students present for 'Voter Survey'-22/02/2020**




**Students marching for Voter Survey to 'Vihitgaon'-22/02/2020**




Students conducting Survey-22/02/2020




Students conducting Survey-22/02/2020

# VOTER AWARENESS DRIVE




**Rally on 'Voter Awarness Day'-25/01/2019**




**Rally on 'Voter Awarness Day'-25/01/2019**




**Rally on 'Voter Awarness Day'-25/01/2019**

# VOTERS SURVEY




**Students conducting Survey-11/02/2019**




**Students conducting Survey-11/02/2019**




**HOD Dr. V. D.Kapadi, Mr. S. W.Pawar, Mr. S.S.Kawale & Student Present on 'Voter Survey'-11/02/2019**

# CONSTITUTION DAY




**Prin. Dr. Vijay Medhane paying the tribute to Dr. Babasaheb Ambedkar-26/11/2018**




**College Staff  and students taking Pledge--26/11/2018**

**College Staff and students taking Pledge on National Voter Day 25 Jan 2022**



**Dr. R. D. Agwane Delivered Lecture on 26 Nov 2021 on Savidhan Day**




**Department of Political Science**